# २. संधी

**प्रस्तावना :**

प्रत्येक भाषेच्या व्याकरणामध्ये संधीस महत्त्वपूर्ण स्थान असते. संधीमुळे शब्दांचे आकार संक्षिप्त होण्यास मदत होते. तर संधिविग्रहामुळे शब्दोच्चारास सुलभता येते. संधिनियमानुसार संधीचे (१) स्वरसंधी, (२) प्रकृतिभावसंधी, (३) उद्वृत्तस्वरसंधी, (४) अव्ययस्वरसंधी, (५) व्यंजनसंधी असे पाच प्रकार (विभाग) पडतात.

दोन स्वर किंवा एक स्वर/ एक व्यंजन किंवा व्यंजन-व्यंजन एकत्रित आले तरी संधी होतो. तसेच संस्कृतमध्ये विसर्ग आणि स्वर किंवा व्यंजन, एकत्र आले तरीही संधी होते.

महाराष्ट्री प्राकृतात विसर्ग नसल्याने प्राकृतात विसर्गसंधी होत नाही. तसेच महाराष्ट्री प्राकृत ही बोलीभाषा असल्याने व सुलभीकरण हे बोली भाषेचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याने महाराष्ट्री प्राकृतात बऱ्याच ठिकाणी संधी होतोच असे नाही. तरीही प्राकृतातील सर्व संधिनियमाचा परिचय करून घेणे आवश्यक आहे.

दोन वर्णांच्या एकत्रित येण्याने जो बदल होतो त्यास संधी असे म्हणतात.

## स्वर-संधी

स्वर-संधीचे (१) दीर्घसंधी, (२) गुणसंधी, (३) ऱ्हस्व-संधी, (४) संधि-निषेध, (५) स्वरलोप संधी इत्यादी प्रकार आहेत.

### (1) दीर्घसंधी

**अ)** दोन सजातीय स्वर एकत्र आले असता त्यांचे दीर्घ स्वरांमध्ये रूपांतर होते. म्हणजेच (अ) अ अथवा आ या स्वरापुढे अ किंवा आ हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'आ' (दीर्घ) मध्ये होते. (अ + अ = अ/आ + आ = आ). उदा. –

| | |
|---|---|
| जीव + अजीव = जीवाजीव | इह + आगमण = इहागमण |
| गाम + अणुग्गाम = गामाणुग्गाम | कला + आअरिय = कलाअरिय |
| रअण + आअरो = रअणाअरो | तहा + अवि = तहावि |
| राआ + अभिसेओ = राआभिसेओ | जहा + अवि = जहावि |
| दुह + आवह = दुहावह | जिण + आलअ = जिणालअ |
| धम्म + अधम्म = धम्माधम्म | गण + अहिवइ = गणाहिवइ |
| विज्जा + आलअ = विज्जालअ | |

अ + आ = आ होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वराच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर असेल तर त्याचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व 'अ' होतो. उदा –

| | |
|---|---|
| भिक्ख + अट्ठा = भिक्खट्ठा | दव + अग्गि = दवग्गि |
| जीविअ + अट्ठा = जीविअट्ठा | जम्म + अंतर = जम्मंतर |
| ण + अत्थि = णत्थि | रत्त + अच्छ = रत्तच्छ |
| मरण + अंतर = मरणंतर | कोह + अग्गि = कोहग्गि |

**ब)** इ अथवा ई च्या पुढे इ किंवा ई आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ 'ई' मध्ये होते. उदा. –

मुणि + ईसर = मुणीसर
णंदी + ईसर = णंदीसर
पुहवी + ईसर = पुहवीसर
मुणि + इणो = मुणीणो
दहि + ईसर = दहीसर
लच्छी + ईसरो = लच्छीसरो
कवि + ईसर = कवीसर

इ + ई = ई होतो. परंतु दुसऱ्या शब्दातील स्वराच्या पुढे जर अनुस्वार किंवा जोडाक्षर आले तर त्याचे दीर्घ स्वरात रूपांतर न होता ऱ्हस्व 'इ' होतो. उदा. –

मुणि + इन्द = मुणिन्द
कवि + इन्द = कविन्द
महि + इन्द = महिन्द

**क)** उ अथवा ऊ या स्वरापुढे 'उ किंवा ऊ' हे स्वर आले असता त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरामध्येच होते. उदा. – बहू + उवयार = बहूवयार

साहू + ऊसव = साहूसव
साहु + उत्तम = साहूत्तम
महू + ऊसव = महूसव
बहू + उदगं = बहूदगं
वहू + ऊसव = वहूसव
धेणु + ऊसवो = धेणूसवो

उ + ऊ = ऊ होतो. परंतु पहिल्या शब्दातील स्वराच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार आल्यास त्याचे रूपांतर दीर्घ (ऊ) स्वरामध्ये न होता 'ऱ्हस्व' स्वरामध्ये (उ) च होते. उदा. –

साहू + उत्तं = साहुत्तं
दूर + उज्झिया = दूरुज्झिया

## (२) गुणसंधी

**अ)** अ अथवा आ या स्वराच्या पुढे 'इ किंवा ई' हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर 'ए' मध्ये होते.

उदा. –

राअ + इसि = राएसि
जहा + इव = जहेव
महा + इसि = महेस
णर + ईसर = णरेसर
तेण + इव = तेणेव
दम + ईसर = दमेसर
इह + इव = इहेव
खअर + ईसर = खअरेसर

अ + इ = 'ए' होतो. परंतु पहिल्या शब्दातील स्वराच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर त्याचे रूपांतर 'ए' मध्ये न होता ऱ्हस्व 'इ' स्वरामध्ये रूपांतर होते.

उदा. –

णर + इंद = णरिंद (णरेंद)
ण + इच्छइ = णिच्छइ (णेच्छइ)
महा + इन्द = महिंद (महेंद)
जह + इच्छिइ = जहिच्छिइ
सुर + इन्द = सुरिंद
चरण + इंधण = चरणिंधण
देव + इन्द = देविंद
महा + इड्ढिय = महिड्ढिय
जिण + इन्द = जिणिंद

ब) अ अथवा आ या स्वरांच्या पुढे ‘उ अथवा ऊ’ हे स्वर आल्यास त्या दोन्ही स्वरांचे रूपांतर ‘ओ’ मध्ये होते.

तस्स + उवरि = तस्सोवरि

किस + उअरी = किसोअरी

जहा + उइअं = जहोइअं

महा + उवआर = महोवआर

महा + ऊसव = महोसव

जहा + उचिअ = जहोचिअ

एक + ऊण = एकोण

णीसास + उसास = णीसासोसास

मास + उववास = मासोववास

अ + उ = ओ होतो. परंतु पहिल्या शब्दातील स्वराच्या पुढे जोडाक्षर किंवा अनुस्वार असेल तर ‘ओ’ न होता ऱ्हस्व (उ) स्वरात रूपांतर होईल.

उदा. –

णअर + उज्जाण = णअरुज्जाण

पुरिस + उत्तम = पुरिसुत्तम

भवण + उज्जाण = भवणुज्जाण

उत्तम + उत्तम = उत्तमुत्तम

रअण + उज्जल = रअणुज्जल

कुल + उब्भव = कुलुब्भव

तेण + उत्तं = तेणुत्तं

भअ + उव्विग्ग = भउव्विग्ग/भयुव्विग्ग

सव्व + उत्तम = सव्वुत्तम

रत्त + उप्पल = रत्तुप्पल

क) ‘अ अथवा आ’ या स्वराच्या पुढे ‘ए’ हा स्वर आल्यास त्याचे रूपांतर ‘ए’ मध्येच होते. उदा. –

जहा + एव = जहेव

च + एव = चेव

तहा + एव = तहेव

इह + एव = इहेव

एक + एक = एकेक

केण + एव = केणेव

ण + एव = णेव

पहिल्या शब्दातील शेवटच्या वर्णावर अनुस्वार असेल तर प्रथम त्याचा ‘म’असा बदल करून नंतर संधिनियमानुसार संधी केला जातो.

उदा. –

एकं + एक = एकमेक

किं + अत्थ = किमत्थ/किमेत्थ

एक्कं + एक्क = एक्कमेक्क

तं + आसणं = तमासणं

किं + एस = किमेस

जुत्तं + एअं = जुत्तमेअं

तं + एव = तमेव

एवं + आइ = एवमाइ

जं + एव = जमेव

विवेगं + एउं = विवेगमेउं

अण्ण + अण्ण = अण्णमण्ण

### (३) स्वरलोप संधी

केव्हा केव्हा संधी करतेवेळी दुसऱ्या शब्दातील प्रथम स्वराचा लोप करून 'य, र, म' या बाह्य वर्णांचे आगम होऊन संधी केला जातो. यालाच स्वरलोप संधी म्हणतात.

अ) 'र' आगम संधी :

धि + अत्थु = धिरत्थु

णि + अंतर = णिरंतर

णि + आनंद = णिराणंद

णि + अणुकंपा = णिराणुकंपा

णि + उपमा = निरुपमा

पुण + अवि = पुणरवि

दु + आचारिणी = दुराचारिणी

दु + अंगुल = दुरंगुल

चउ + अंगुलं = चउरंगुल

ब) 'य' आगम संधी :

दु + अंगुल = दुयंगुल

त + आसन्ने = तयासन्ने

त + अणंतरं = तयणंतर

क) 'म' आगम संधी :

भवइ + आइणो = भवइमाइणो

### (४) अव्यय-स्वर-संधी

अव्ययात पहिला स्वर आल्यास त्याचा विकल्पाने लोप होतो.

केण + अपि = केणावि, केण वि, केणापि (येथे 'अ'चा लोप झाला.)

किं + अपि = किमवि, किं पि

सुअणा + अपि = सुअणा वि

तं + अपि = तं पि

पुरिसो + इति = पुरिसो त्ति

दिट्ठं + इति = दिट्ठं ति

तहा + इति = तहत्ति

णत्थि + इति = णत्थि त्ति

पढमं + इति = पढमं ति

दोसइ + इति = दोसइ ति

दिट्ठं + इति = दिट्ठं ति

### (५) द्वित्व संधी

त + कम्म = तक्कम्मं

त + खणं = तक्खणं

स + भिक्ख = सब्भिक्ख

जाव + जीव = जावज्जीव

णि + णेह = णिण्णेह

णि + करुणा = णिक्करुणा

दु + जणो = दुज्जणो